# शहर-समाज



**आषाढी** • मंत्री आदिती तटकरे यांनी घेतले संत मुक्ताईंचे दर्शन

# संत मुक्ताई दर्शनासाठी कोथळी, नवीन मंदिरात वारकऱ्यांची गर्दी

शहर प्रतिनिधी | मुक्ताईनगर

आषाढी एकादशीनिमित्त कोथळी येथील संत मुक्ताई मूळ मंदिर, मुक्ताईनगर शहरातील नवीन मुक्ताई मंदिरात हजारो वारकरी आणि भाविकांनी दर्शनासाठी अभूतपूर्व गर्दी केली. खान्देशसह विदर्भ व मध्य प्रदेशातून आलेल्या भाविकांनी दिवसभर दर्शनासाठी रांगा लावल्याने दोन्ही मंदिर परिसर संत मुक्ताईंच्या जयघोषाने आणि नामस्मरणा दुमदुमून गेला. पंढरपूर येथे जाऊ शकणारे भाविक या दिवशी सं मुक्ताईंच्या दर्शनासाठी येतात.

कोथळी येथील संत मुक्ताई मू मंदिरात पहाटे अभिषेक महापूजा पा पडली. त्यानंतर दर्शनासाठ भाविकांच्या लांबच लांब रां लागल्या. मंदिरात आलेल्य भाविकांसाठी सुमारे दीड क्विंटल साबुदाणा खिचडीच्या फराळाचे वाट करण्यात आले. हा महाप्रसाद बाबुरा ठाकरे, योगेश चोपडे आणि राजें पानकर यांनी दिला. नवीन मुक्ता मंदिरातही वै. लक्ष्मण बळीराम चौधर यांच्या स्मरणार्थ मनोज चौधरी यांनी



मंत्री आदिती तटकरेंनी मुक्ताईची महाआरती केली. सोबत जिल्हाध्यक्ष उमेश नेमाडे.

## रांगोळी ठरली लक्षवेधी

कोथळी येथील मूळ मंदिरात रांगोळी कलाकार देवा रावण चवरे यांनी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विविध संतांची आकर्षक रांगोळी साकारली. या देखण्या कलाकृतीने भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. दिवसभर भाविकांनी रांगोळीसमोर छायाचित्रे काढत कलाकाराच्या कौशल्याचे कौतुक केले.

## वारकऱ्यांना देण्यात आले सायबर सुरक्षेचे धडे

धार्मिक उत्सवासोबतच सामाजिक जनजागृतीचा अभिनव संगम पाहायला मिळाला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्सच्या क्विक हील सायबर वॉरियर क्लब, क्विक हील फाउंडेशन आणि महाराष्ट्र सायबर पोलिसांनी सायबर वारकरी ही जनजागृती मोहीम राबवली. वारकरी वेशभूषेत सजलेल्या २० सायबर वॉरियर्सनी सायबर सुरक्षेचे संदेश देणारे फलक, पोस्टर्स आणि विशेष कॅप्सच्या माध्यमातून भाविकांमध्ये जागरूकता निर्माण केली. तीन वेगवेगळ्या पालख्यांसमोर विद्यार्थ्यांनी प्रभावी नृत्य, पथनाट्य, संवादात्मक कार्यक्रम सादर करत ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, ओटीपी व यूपीआय फसवणूक, सोशल मीडिया गैरवापर, डिजिटल व्यवहारातील सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले.

---

चार क्विंटल साबुदाणा खिचडी

विकास मंत्री आदिती तटकरे यांनी

शनिवारी सकाळी संत मुक्ताईंचे दर्शन

महाराज जुनारे यांनी श्रीफळ व संत

मुक्ताई चरित्र ग्रंथ भेट देऊन त्यांचा

उमेश नेमाडे यावेळी उपस्थित होते.